MHPA220008432022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १८/११/२०२२ |
| नोंदणी तारीख | : | १८/११/२०२२ |
| निकाल तारीख | : | ११/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०३ ०३ १९ |

---

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))

**पालम येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी मनिषा म. पाटील)**

**(जाहीर दिनांक – ११/०३/२०२६)**

---

**नियमित फौजदारी खटला क्र. १४६/२०२२**

(गु.र.क्र.१९५/२०२२ पालम पोलीस ठाणे)

**निशाणी क्रमांक – ७७**

**फिर्यादी** — **महाराष्ट्र सरकार तर्फे**
**पोलीस निरीक्षक,**
पोलीस स्टेशन पालम,
ता. पालम, जि. परभणी

**प्रतिनिधीत्व** — **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एन. डावकरे**

**आरोपी**

१. **बालाजी विश्वनाथ सुरनर**
वय – ५२ वर्षे, व्यवसाय– शेती,

२. **प्रशांत बालाजी सुरनर**
वय – २६ वर्षे, व्यवसाय– शेती,

३. **प्रकाश विश्वनाथ सुरनर**
वय – ४२ वर्षे, व्यवसाय– शेती,

४. **नारायण विक्रम सुरनर**
वय – ३० वर्षे, व्यवसाय– शेती,

५. **ज्ञानेश्वर भाऊसाहेब सुरनर**
वय – २६ वर्षे, व्यवसाय– शेती,

६. **सिध्देश्वर भाऊसाहेब सुरनर**
वय – २२ वर्षे, व्यवसाय– शेती,

७. **भाऊसाहेब सखाराम सुरनर**
वय – ५० वर्षे, व्यवसाय– शेती,

८. **जयश्री नारायण सुरनर**
वय – २८ वर्षे, व्यवसाय– शेती,

९. **सुशीलाबाई बालाजी सुरनर**
वय – ४५ वर्षे, व्यवसाय– शेती,

१०. **गुजाबाई भाऊसाहेब सुरनर**
वय – ४६ वर्षे, व्यवसाय– शेती,

११. **विलास बालाजी सुरनर**
वय – २१ वर्षे, व्यवसाय– शिक्षण,

सर्व. रा. तावजीवाडी, ता. पलाम, जि. परभणी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपींकरीता वकील श्री. ए. ए. अंबेकर**

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**ii**))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २१/०८/२०२२ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २२/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १८/११/२०२२ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २७/०१/२०२६ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १७/०२/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | लागु नाही |

| | |
|---|---|
| निकालाची तारीख | १०/०३/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बालाजी विश्वनाथ सुरनर | २२.०८.२०२२ | २२.०८.२०२२ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४ व ५०६ सह कलम १४९ आणि म. पो. अधि. कलम १३५ प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |
| २. | प्रशांत बालाजी सुरनर | | | | | | |
| ३. | प्रकाश विश्वनाथ सुरनर | | | | | | |
| ४. | नारायण विक्रम सुरनर | | | | | | |
| ५. | ज्ञानेश्वर भाऊसाहेब सुरनर | | | | | | |
| ६. | सिध्देश्वर भाऊसाहेब सुरनर | | | | | | |
| ७. | भाऊसाहेब सखाराम सुरनर | | | | | | |
| ८. | जयश्री नारायण सुरनर | | | | | | |
| ९. | सुशीलाबाई बालाजी सुरनर | | | | | | |
| १०. | गुजाबाई भाऊसाहेब सुरनर | | | | | | |
| ११. | विलास बालाजी सुरनर | | | | | | |

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | काशीनाथ भिमराव सुरनर | फिर्यादी |
| अ.सा.२ | आशाबाई होणाजी देवकते | प्रत्यक्षदर्शी/जखमी साक्षीदार |
| अ.सा.३ | बळीराम भिमराव सुरनर | प्रत्यक्षदर्शी/जखमी साक्षीदार |
| अ.सा.४ | केशव लक्ष्मण सुरनर | प्रत्यक्षदर्शी/जखमी साक्षीदार |

## ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ६८/अ.सा.क्र.१ | फिर्यादवरील अ.सा.क्र. १ यांची सही |
| २ | ७१ | घटनास्थळ पंचनामा (आरोपींनी मान्य केलेला) |
| ३ | ७२ | जप्ती पंचनामा (आरोपींनी मान्य केलेला) |

## ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | एक काळसर रंगाचा २५० ग्रॅम वजनाचा दगड |
| २. | -- | एक गोलाकार आकाराचा ५०० ग्रॅम वजनाचा दगड |
| ३. | -- | एक लालसर रंगाचा गोल आकाराचा २५० ग्रॅम वजनाचा दगड |
| ४. | -- | एक ३२ इंच लांब व ४.५ इंच गोलाई असलेली काठी |
| ५. | -- | एक २७ इंच लांब व ४ इंच गोलाई असलेली काठी |

# न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक-११/०३/२०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपींचेविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४ व ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे १९५१ कलम ३७ (१)(३) चे दंडनिय कलम १३५ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

## २. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

दि. २१/०८/२०२२ रोजी रात्री १०.३० वाजता फिर्यादी काशीनाथ सुरनर यांच्या घरासमोर सार्वजनिक रस्त्यावर आरोपी हे त्यांच्या हातात काठ्या व दगडे घेऊन आले आणि त्यांच्या घरावर दगड फेकुन मारू लागले. आरोपी बालाजी याने ''कोर्टातील भांडण चालु असलेली शेती गट क्र. ११७ मधील तीन एकर शेती आम्ही विद्या चव्हाण यांना विकली तर तुम्ही का जळता व ती शेती आमची आहे'' असे म्हणुन फिर्यादीस मारण्याच्या धमक्या दिल्या. आरोपी विलास याने त्याच्या हातातील दगड हा फिर्यादीच्या मानेवर मारून त्यास दुखापत केली. आरोपी प्रशांत याने आशाबाई देवकते हिला लाथा बुक्क्याने मारून दुखापत केली. तसेच सर्वांनी शिवीगाळ करून ''शेती विकल्याचा विषय केला तर खतम करून टाकु'' असे म्हणुन त्यांना धमकी दिली. त्यांचे भांडण सोडवण्यासाठी बळीराम सुरनर व केशव सुरनर हे आले असता त्यांना देखील सर्व आरोपींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून खतम करण्याची धमकी दिली म्हणुन आरोपींविरूध्द फिर्याद दाखल करण्यात आली.

३. सदर फिर्यादीवरुन पालम पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. १९५/२०२३ ने प्रथम खबरी अहवाल नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पो. नि. काकडे, पोलीस ठाणे, पालम यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तसेच तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आलेने त्यांनी आरोपींचेविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३३६, ५०४ व ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे १९५१ कलम ३७ (१)(३) चे दंडनिय कलम १३५ दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. दोषारोपपत्राप्रमाणे मी आरोपींचेवर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४ व ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ३७ (१)(३) चे दंडनिय कलम १३५ अन्वये अपराध केल्याबाबतचा दोषारोप (नि.४९) ठेवला. त्यामधील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

**५.** आरोपींविरुध्दच्या गुन्ह्याच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षातर्फे न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मधील साक्षीपुराव्याचा आधार घेतला. प्रकरणातील फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नसल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्यावरून आरोपींविरूध्द पुरावा आला नसल्याने त्यांची निवेदने वगळण्यात आलीत.

**६.** सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. एन. डावकरे व आरोपी करिता वकिल श्री. ए. ए. अंबेकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. २२/०८/२०२२ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास मौजे तावजीवाडी, ता. पालम, जि.परभणी येथील फिर्यादीच्या घरासमोर सर्व आरोपींनी अपराधाचे समान उद्दीशष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव केला व जाणीवपुर्वक त्या जमावाचे सदस्य बनल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... **नाही** |
| २. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने जमाव करून दंगा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... **नाही** |
| ३. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने हातात काठ्या व दगड घेऊन जमाव करून दंगा केला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... **नाही** |
| ४. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपी क्र. ११ याने फिर्यादी काशीनाथ यास दगडाने पाठीत मारहाण करून | ... **नाही** |

| | | |
|---|---|---|
| | ईच्छापुर्वक दुखापत पोहचवल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | |
| ५. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपींनी साक्षीदार आशाबाई, बळीराम व केशव यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत पोहचवल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ६. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने मानवी जीवन किंवा इतरांची वैयक्तीक सुरक्षा धोक्यात येईल याची माहिती असताना निष्काळजीपणे फिर्यादीच्या घरावर दगडफेक केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ७. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी केली व त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ८. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी व धमकी देऊन फौजदारी पात्र धाकदपटशा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ९. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी मा. जिल्हाधिकारी परभणी यांच्या जिल्ह्यातील ५ किंवा या पेक्षा अधिक लोकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्रीत येण्यापासुन प्रतिबंधीत केल्याबाबतचा आदेश असतानाही सर्व आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने लाकडी काठ्या या सारख्या शारिरिक हिंसा घडवुन आणणाऱ्या | **... नाही** |

| | | |
|---|---|---|
| | हत्यानानिशी गैरकायदा जमाव केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | |
| १०. | वर नमूद दिनांक, वेळी व स्थळी आरोपींनी मा. जिल्हाधिकारी परभणी यांच्या जिल्ह्यातील ५ किंवा या पेक्षा अधिक लोकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्रीत येण्यापासुन प्रतिबंधीत केल्याबाबतचा आदेश असतानाही सर्व आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने दगड या प्राणघातक शस्त्रांसह गैरकायदा जमाव केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | **... नाही** |
| ११. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करणेत येते.** |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते १० करीताः–**

**७.** मुद्दा क्र.१ ते १० हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन करताना घटनांची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी ते चर्चेकरिता एकत्रात घेण्यात आले आहेत.

**८.** सदर प्रकरणी अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला तोंडी व लेखी पुरावा तसेच आरोपीविरुध्द नोंद असलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगिक घटक यांचा सारासार विचार करता सदरचा गुन्हा करणेसाठी आरोपींनी अपराधाचा समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने लाकडी काठ्या व दगड या हत्यारांनी सज्ज होऊन फिर्यादीच्या घरावर दगड फेक केली व फिर्यादीस दगडाने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोचवली, साक्षीदार आशाबाई, बळीराम व केशव यांना आरोपींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून दुखापत केली तसेच फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून त्यांना अपमानीत केले तसोच त्यांना व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या असल्याचे अभियोग पक्षाने निसंशयरित्या सिध्द केले आहे काय हे पाहणे अत्यंत जरूरीचे आहे.

९. विवेंचनाला सुरूवात करण्यापुर्वी काही गोष्टींची नोंद घेणे महत्वपुर्ण ठरते यातील आरोपी व फिर्यादी यांच्या दरम्यान न्यायालयाबाहेर आपापसात तडजोड झाली असल्याची तडजोड पुरसीस (नि.६३) त्यांना अभिलेखावर दाखल केली आहे. मात्र भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४८, ३२४ सहकलम १४९ प्रमाणे शिक्षापात्र असणारे गुन्हे तडजोडीस पात्र नसल्याने सदरचा खटला हा पुढे चालवण्यात आला आहे. या पार्श्वभुमीवर अभिलेखावरील पुराव्याचे साकल्याने अवलोकन केले.

१०. अभियोग पक्षातर्फे तपासलेले फिर्यादी सा.क्र.१ काशीनाथ (नि.६७) त्यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, घटना कधी, कुठे व काय घडली हे त्यांना सांगता येत नाही. त्यांनी आरोपींच्याविरूध्द फिर्याद दाखल केली होती परंतु त्यातील मजकुर त्यांना माहिती नसुन त्यांनी फक्त फिर्यादीवरील त्यांची सही (नि.६८) ओळखली आहे. फिर्यादी हे अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्यांना सुचकप्रश्न विचारले असता त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही कथने केली नाहीत. याउलट त्यांनी अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीने गुन्हा केला असल्याची बाब नाकारली आहे. त्यांना त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखवला असता त्यांनी त्याप्रमाणे घडले नसल्याचे कथन केले आहे.

११. अभियोग पक्षातर्फे तपासलेली सा.क्र. २ आशाबाई (नि.६९) व सा.क्र. ३ बळीराम (नि.७४) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना कधी, काय व कुठे घडली हे त्यांना माहिती नाही. सदर साक्षीदारांनी सरतपासात घटनेविषयी त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार हे अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्यांना सुचकप्रश्न विचारले असता त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही कथने केली नाहीत.

१२. अभियोग पक्षातर्फे तपासलेले सा.क्र. ४ केशव (नि.७५) याच्या पुराव्यात याने घटना ही गावात घडली होती व घटनेत संभाजी व बालाजी यांची भांडणे लागली होती. ती भांडणे त्यांनी सोडवा सोडव केली होती असे कथन केले. परंतु, त्यांच्या दरम्यान कशावरून भांडण झाले होते याचे कारण व त्या भांडणामध्ये कोणी कोणाला मारले व किती मारले याची त्यांना माहिती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदारानेही त्याच्या सरतपासात अभियोग पक्षास सहाय्य केलेले नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांनाही सुचक प्रश्न विचारले. परंतु सदर

साक्षीदाराच्या पुराव्यातुनही अभियोग पक्षास सहाय्य होईल असे काही आलेले नाही.

**१३.** सा.क्र.१ काशीनाथ, सा.क्र. २ आशाबाई, सा.क्र. ३ बळीराम व सा.क्र. ४ केशव हे फिर्यादी व जखमी साक्षीदार असुनही त्यांनीच अभियोग पक्षास आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द करणेसाठी पुरक अशी साक्ष दिलेली नाही. आरोपींनी गुन्हा केल्याबाबत त्यांनी एकही विधान उच्चारलेले नाही. आरोपींनी त्यांना मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली असल्याची बाबही त्यांनी कथन केलेली नाही. मुळात सदर फिर्यादी व साक्षीदारांनी आरोपींनी काय गुन्हा केला हेही सांगितलेले नाही. याउलट त्यांच्या जबाबतील अधोरेखांकीत मजकुर 'अ' ते 'ड' प्रमाणे घटना घडली नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यामुळे त्यांच्या साक्षीद्वारे आरोपीने गुन्हा केलेचे पटलवार आलेले नाही. आरोपींनी याकामी घटनास्थळ पंचनामा (नि.७१) व जप्तीपंचनामा (नि.७२) मान्य केले आहे. परंतु त्यावरून आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द होत नाही. अभिलेखावर असलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरून आरोपीने गुन्हा केला असल्याचे शाबीत होत नाही. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होईल इतका सबळ पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही.

**१४.** एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन प्रस्तुत आरोपींनी अपराधाचे समान उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव केला, त्यांनी जाणीवपुर्वक त्या जमावाचे सदस्य बनले, त्यांनी लाकडी काठ्या व दगड यासारख्या शस्त्रानिशी सज्ज होवून दंगा केला, सदर शस्त्रांच्या सहाय्याने फिर्यादीच्या घरावर दगड फेक केली, फिर्यादीला दगडाने व साक्षीदार यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली, फिर्यादीला शिवीगाळ व धमकी दिली असल्याचे निसंशयरित्या सिध्द करण्यात अभियोग पक्षाला अपयश आल्याचे स्पष्ट दिसून येते.

**१५.** फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबीतीकरीता अभियोग पक्षाने संशयापलीकडे जाऊन आरोप सिध्द करणे गरजेचे असते. यदाकदाचित अशा प्रक्रियेत संशयाचा एक जरी धागा निर्माण करण्यास आरोपी यशस्वी ठरला असेल तर त्याचा फायदा आरोपीला मिळतो. या खटल्यामध्ये प्रस्तुत आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणेत आलेला नाही. प्रस्तुत आरोपींविरुध्द संशयावरुन गुन्हा दाखल केल्याचे दिसून येते. सबब मी मुद्दा क्र. १ ते १० बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ११ करीताः–</u>**

१६. उपरोक्त विवेचनावरून अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला उचित वाटते.

१७. याकामी दोषारोपपत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे व न्यायनिर्णय भाग 'क' मधील मुद्देमाल रकान्यात सविस्तर नमुद केलेला जप्त मुद्देमाल 'एक काळसर रंगाचा २५० ग्रॅम वजनाचा दगड, एक गोलाकार आकाराचा ५०० ग्रॅम वजनाचा दगड, एक लालसर रंगाचा गोल आकाराचा २५० ग्रॅम वजनाचा दगड, एक ३२ इंच लांब व ४.५ इंच गोलाई असलेली काठी व एक २७ इंच लांब व ४ इंच गोलाई असलेली काठी' हे मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करणे उचित होईल असे मला वाटते. वर नमुद कारणास्तव मुद्दा क्र. ११ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>:: आदेश ::</u>**

१. **आरोपी क्र. १ बालाजी विश्वनाथ सुरनर, आरोपी क्र. २ प्रशांत बालाजी सुरनर, आरोपी क्र. ३ प्रकाश विश्वनाथ सुरनर, आरोपी क्र. ४ नारायण विक्रम सुरनर, आरोपी क्र. ५ ज्ञानेश्वर भाऊसाहेब सुरनर, आरोपी क्र.६ सिध्देश्वर भाऊसाहेब सुरनर, आरोपी क्र. ७ भाऊसाहेब सखाराम सुरनर, आरोपी क्र.८ जयश्री नारायण सुरनर, आरोपी क्र. ९ सुशीलाबाई बालाजी सुरनर, आरोपी क्र. १० गुजाबाई भाऊसाहेब सुरनर व आरोपी क्र. ११ विलास बालाजी सुरनर** यांची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४ व ५०६ सह कलम १४९ व महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम ३७(१)(३) चे दंडनिय कलम १३५ च्या आरोपांतून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ (१) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु.५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

**४.** प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल ''एक काळसर रंगाचा २५० ग्रॅम वजनाचा दगड, एक गोलाकार आकाराचा ५०० ग्रॅम वजनाचा दगड, एक लालसर रंगाचा गोल आकाराचा २५० ग्रॅम वजनाचा दगड, एक ३२ इंच लांब व ४.५ इंच गोलाई असलेली काठी व एक २७ इंच लांब व ४ इंच गोलाई असलेली काठी'' हे मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.03.13 16:42:14 +0530

**दिनांक – ११/०३/२०२६**

**(मनिषा म. पाटील)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पालम.**